महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## सामाजिक व पर्यावरणाचे धोरण

### १.० प्रास्ताविक /भूमिका

महापारेषण कंपनीला जाणीव आहे की, तिच्या कामकाजामुळे समाजावर आणि पर्यावरणावर होणा-या परिणामांचे प्रभावी व्यवस्थापन करणे. कंपनीचे प्रकल्प आणि त्यातील कामकाजाच्या यशासाठी आवश्यक आहे. सामाजिक व पर्यावरण यावर होणा-या परिणामांमुळे कंपनीसमोर पुढील प्रकारच्या समस्या उभ्या राहतात.

अ) प्रकल्प पूर्ण करण्यात येणारे अडथळे (गेलेला वेळ व खर्च)

ब) कामकाज चालविताना येणारे धोके ( यात खर्चाची रचना बदलणे, स्थानिक लोकांशी संघर्ष उद्‌भवणे, कर्मचा-यांचे नीतीधैर्य व उत्पादकता यावर होू शकणारे परिणाम, वाया जाणारा वेळ, न्यायालयात जाणारी प्रकरणे आणि भरपाई देण्याचे प्रश्न इ.)

क) कंपनीच्या नावलौाकिकास निर्माण होणारे धोके (प्रकल्पग्रस्त लोक, कर्मचारी आणि अन्य हितसंबंधी गटांची आंदोलने इ.) महापारेषण कंपनीला ज्या कारणामुळे अशा धोक्यांना तोंड द्यावे लागते ती अशी : लोकांचा रस्त्यावरुन जाण्याचा हक्क हिरावला जाणे (ROW), भूसंपादन करावे लागणे आणि त्यामुळे स्थानिक लोकांचे आर्थिकदृष्टया विस्थापन होणे, तसेच प्रत्यक्ष विस्थापन होणे, कर्मचा-यांना प्रतिकूल परिस्थितीत काम करावे लागल्यास उद्‌भवणारे व्यावसायिक आजार आणि सुरक्षेचे प्रश्न, स्थानिक लोकांच्या सामुदायिक आरोग्य आणि सुरक्षेचे प्रश्न, पर्यावरणावर होणारे आघात, गैविक विविधता आणि नैसर्गिक स्त्रोत यांचे प्रश्न (विशेषतः प्रकल्पाचे बांधकाम करताना) आणि कामकाज चालविताना होणा-या उत्सर्जनामुळे व बाहेर फेकल्या जाणा-या पदार्थामुळे येणा-या समस्या इ.

अशा धोक्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी महापारेषण कपंनीने आपले सामाजिक व पर्यावरण विषयक धोरण आखले आहे. (याचा उल्लेख पुढे संक्षेपाने 'सामाजिक व पर्यावरण धोरण' असा केला आहे) या धोरणात पुढील बाबींचा समावेश आहे.

अ) कंपनी प्रकल्प उभारताना आणि नंतर त्याचे कामकाज पार पाडतांना सामाजिक व पर्यावरणाचे रक्षण करण्यास कंपनी बांधील आहे.

ब) महापारेषण कंपनीने या 'सामाजिक व पर्यावरण धोरणाची' ज्या तत्वांवर उभारणी केली आहे, ती तत्वे.

महापारेषण कंपनीने हे धोरण तयार करताना ते कर्ज पुरवठा करणा-या बहुविध संस्था (जागतिक बँक, इंटरनॅशनल फायनान्स कार्पोरेशन, आणि एशियन डेव्हलपमेंट बँक) तसेच खाजगी वित्तीय संस्था प्रामुख्याने 'इक्वेटर फायनान्शियल इन्स्टिटयूशन' (इ.एफ.पी.आय्.) यांनी सामाजिक आणि पर्यावरणाच्या रक्षणासंबंधी निश्चित केलेल्या प्रमाणकांशी (Standard) सुसंगत राहिल, याची दक्षता घेतली आहे.

## २.० धोरणाची व्याप्ती

महापारेषण कंपनीचे हे सामाजिक आणि पर्यावरणीय धोरण कंपनीच्या कामाच्या सर्व क्षेत्रास लागू राहील. यामध्ये (अ) प्रकल्प – संकल्पनेपासून कार्यान्वयापर्यंत (ब) संचालन व सुव्यवस्था (देखभाल) (क) कंपनीची सर्व सांघिक कर्तव्ये (कार्पोरेट फायनान्स)

## ३.० तत्वे

३.१ महापारेषण कंपनीचे कार्य सामाजिक आणि पर्यावरणाच्या सर्व कायद्यांवर निष्ठा ठेवून चालेल.

३.२ महापारेषण कंपनी सर्व सामाजिक आणि पर्यावरणाचे सर्व संभाव्य धोके आणि त्याचा कंपनीच्या कामकाजावर होणारा परिणाम याचा अंदाज घेऊन त्याचे व्यवस्थापन करील. महापारेषण कंपनीच्या उपाय योजना जागतिक बँक तसेच एशियन डेव्हलपमेंट बँक यांची सामाजिक व पर्यावरण रक्षणाची धोरणे, आय.एफ.सी. ची सामाजिक आणि पर्यावरण रक्षणाची प्रमाणके आणि 'इक्वेटर तत्वे' या सर्वांशी सुसंगत राहतील.

३.३ महापारेषण कंपनी आपल्या कार्याचा प्रभाव असलेल्या क्षेत्रात आपल्या कामकाजाचे कोणते अनिष्ट तसेच लाभदायक परिणाम होतील याचा अंदाज घेऊन त्याचे मूल्यमापन करील. त्यातील अनिष्ट परिणाम टाळण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करील. मात्र असे परिणाम पूर्णपणे टाळणे अशक्य असल्यास ते कमीत कमी व्हावेत व सौम्य स्वरुपात व्हावेत याची काळजी घेईल आणि त्याची बाधा होणारे कामगार, लोक समूह आणि पर्यावरण यांची भरपाई करील.

३.४ महापारेषण कंपनी विशेषतः पुढीलप्रमाणे कार्यवाही करील.

३.४.१ व्यवस्थापन प्रणाली प्रभावीरित्या वापरुन सामाजिक आणि पर्यावरणाच्या कार्यपालनात सुधारणा करणे.

३.४.२ कंपनी ही प्रमुख मालक असल्याने आपल्या कर्मचा-यांसाठी सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण असे कामाचे वातावरण निर्माण करणे, त्यांच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि त्यासाठी प्रोत्साहन देणे.

३.४.३ कंपनी कार्याद्वारे होणा-या प्रदूषणाचे मानवी जीवन आणि परिसर यांच्यावर होऊ शकणारे दुष्परिणाम टाळणे किंवा त्यांचे प्रमाण कमीत कमी होतील याची दक्षता बाळगणे. हवामानांत बदल घडवू शकतील अशा पदार्थांचे उत्सर्जन नाहीसे/कमी करण्यासाठी उपाय योजना करणे आदीचा समावेश यात आहे.

३.४.४ कंपनीच्या (नित्य आणि अनित्य अशा दोन्ही स्वरुपाच्या) कामामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्य आणि सुरक्षा यावर होणारे धोके आणि अनिष्ट परिणाम टाळणे किंवा ते कमीत कमी ठेवणे.

३.४.५ कंपनीचा कर्मचारीवर्ग आणि मालमत्ता यांचे रक्षण कायदेशीर मार्गाने केले जात असल्याबद्दल खात्री करणे. यामुळे लोकांच्या सुरक्षिततेला होणारे धोके कमीत कमी ठेवणे.

३.४.६ अनिच्छेने होणारे पूनर्वसन टाळणे किंवा त्यांचे प्रमाण किमान ठेवणे, जेथे शक्य असेल तेथे प्रकल्पाच्या रचनेबाबत पर्याय शोधणे.

३.४.७ जमीन संपादन केल्यामुळे होणारे सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम कमीत कमी रहावेत याची किंवा बाधित व्यक्तींवरील निर्बंध, (ज्यात अनौपचारिक व राहणा-यांकडून होणा-या जमिनीच्या वापराचा समावेश आहे), कमी व्हावेत यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केली जाईल.

१) मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीची भरपाई, पुनर्वसनाच्या खर्चासह देणे.
२) पुनर्वसनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना त्याची माहिती योग्य प्रकारे जाहीर करणे,सल्लामसलत/समुपदेशन करणे आणि बाधित लोकांना माहिती देऊन सहभागी करून घेणे.
३) विस्थापित व्यक्तींचे पुनर्वसन करताना त्यांचे जीवनमान सुधारणे निदान त्यांचा पूर्वीचा दर्जा कायम ठेवणे.
४) विस्थापितांची जीवनस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी त्यांना पुनर्वसनाच्या जागेवर कालमर्यादेची हमी देऊन पुरेशी घरे देणे.

३.४.८ जैविक विविधतेचे जतन आणि रक्षण करणे, यासाठी नैसर्गिक वसतीस्थाने नष्ट करण्याचे टाळणे किंवा विशेषतः नैसर्गिक आणि वैशिष्टयपूर्ण वसतीस्थानाचा दर्जा अवनत करण्याचे टाळणे. तसेच स्थानिक लोकांचे जीवन ज्या नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून आहे, ते त्यांना सहजपणे उपलब्ध राहतील याची काळजी घेणे.

३.४.९ कंपनीच्या कामाचा मूळच्या रहिवाशांवर अनिष्ट परिणाम होणार नाही, याची दक्षता घेणे.जर हे अपरिहार्य असेल तर त्याबद्दल भरपाई देणे व परिणाम कमीतकमी राहतील याची दक्षता घेणे. त्यांना विकासाच्या व लाभाच्या संधी, सुसंस्कृतपणे उपलब्ध करुन देणे. मूळच्या रहिवाशांना नैसर्गिक स्त्रोतांवर आधारित अशा त्यांच्या जीवनपध्दतीचा विकास पूर्णतः सन्मानाने, मानवी हक्काने, आकांक्षेने आणि सुसभ्य पध्दतीने होईल याची खात्री बाळगणे.

३.४.१० सांस्कृतिक वारशांचे जतन करणे. त्यासाठी मदत करणे व कंपनीच्या कामामुळे अशा वारसांना बाधा होण्याचे टाळणे.

३.५ ज्या लोकसमूहावर महापारेषण कंपनीच्या कामामुळे अनिष्ट परिणाम झाला आहे. त्यांच्यासाठी या परिणामाबाबत योग्य प्रकारे पुढील उपाय योजना महापारेषण कंपनी निश्चितपणे करील. (अ) संबंधित माहिती आधीच आणि योग्य वेळी सुसंस्कृत पध्दतीने जाहीर करणे. (ब) अशा लोकांशी परिणामकारक व सतत सल्लामसलत समुपदेशन करणे. (क) लोकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा स्थापन करणे.

## ४.० प्रत्यक्ष अंमलबजावणी

४.१ हे धोरण महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळोन मान्यता दिल्यानंतर ३ महिन्यात लागू होईल.

४.२ सदर धोरणाचा दर ५ वर्षांनी आढावा घेतला जाईल आणि काळानुरुप संदर्भानुसार त्याची फेरमांडणी करण्यात येईल.

४.३ महापारेषण कपंनीच्या मंडळाच्या मान्यतेनंतर १२ महिन्यात कंपनी या धोरणावर आधारित अशी ‘सामाजिक आणि पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली‘ (सामाजिक व पर्यावरण कार्यपध्दती) विकसित करुन ती अंमलात आणील.

४.४ सामाजिक व पर्यावरण कार्यपध्दतीमध्ये खालीलप्रमाणे तपशीलाची प्रक्रिया राहिल. (अ) धोके ओळखणे व त्यावर बचावात्मक उपाययोजना करणे (पर्यावरण प्रापक (Receptors), सामाजिक प्रापक आणि इतर संबंधित यांना होऊ शकणारे धोके) (ब) धोके टाळण्यासाठीची कृती (यामध्ये धोके निष्प्रभ करण्यासाठी पर्यायी उपयांचा समावेश आहे) (क) अनिष्ट परिणामांचे (आघातांचे) व्यवस्थापन करुन धोके कमी

करणे, यासाठी जागतिक बॅंक गट/आय. एफ. सी.- इ. एस. एच. यांच्या मार्गदर्शनपर सूचनांमधील योग्य आंतरराष्ट्रीय उद्योग प्रथा (Good International Industry Practices GIIP) अंमलात आणणे, बाधित संबंधितांना पुरेशी भरपाई देणे, जाहिरपणे सल्ला देणे व माहितीही देणे आणि गा-हाणी सोडविणे (ड) संनियंत्रण करणे, माहिती योग्य त्या स्तरांवर कळविणे, मूल्यांकन करणे, प्रतिक्रियांची नोंद घेणे, व्यवस्थापनाचा आढावा घेणे आणि सुधारणा करण्यासाठी कृती करणे तसेच (इ) जबाबदारी आणि संसाधने यांचे वाटप करणे यामध्ये सामाजिक व पर्यावरण च्या धोक्याच्या व्यवस्थापनासाठी संघटनात्मक रचना उभारणे यांचाही समावेश आहे.

४.५ ही सामाजिक व पर्यावरण कार्यपध्दती पूर्णपणे तयार होऊन अंमलात येईपर्यंतच्या काळात सामाजिक व पर्यावरण याबाबत प्रत्यक्ष उद्‌भवणा-या धोक्याचे व्यवस्थापन या धोरणानुसार व्हावे यासाठी महापारेषण कंपनी अंतरिम उपाय योजना तयार करील. (Interim Measures)

४.६ महापारेषण कंपनीच्या सर्व कर्मचा-यांना सामाजिक व पर्यावरण धोरण अशा कार्यपध्दतीची माहिती व्हावी यासाठी योग्य असे प्रशिक्षण कार्यक्रम आखून त्याद्वारे प्रशिक्षित करणे.

४.७ महापारेषण कंपनी मुख्यालयात (कार्पोरेट) एक सामाजिक व पर्यावरण कक्ष (Cell) स्थापन करील. त्या कक्षाकडे पुढील जबाबदा-या राहतील. (अ) सामाजिक व पर्यावरण धोरणाचा अर्थ सांगणे. (ब) कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे. त्यात त्रुटी आढळल्यास धोरणानुसार त्यावर उपाय करणे.(क) या धोरणाचा नियत कालावधीनंतर आढावा घेणे व धोरण अद्ययावत व कालानुरुप करण्यासाठी मंडळाकडे शिफारस करणे आणि (ड) सामाजिक व पर्यावरण कार्यपध्दतीचा आढावा घेऊन त्यात सुधारणा करणे.

४.८ सामाजिक व पर्यावरण कक्षाचे काम कार्यक्षमतेने चालण्यासाठी त्यात सामाजिक व पर्यावरण संबंधित विषयातील योग्य पात्रता धारण करणा-या व्यक्तींची नेमणूक महापारेषण कंपनी करील.

४.९ या धोरणाची योग्यप्रकारे अंमलबजावणी व्हावी व त्याची परिणामकारकता अधिक चांगली व्हावी, यासाठी महापारेषण कंपनी दर तीन महिन्यांनी एकदा अंतर्गत अधिका-यांकडून आणि वर्षातून एकदा त्रयस्थ संस्थेकडून (Third Party) तपासणी करत जाईल.

४.१० महापारेषण कंपनी आपल्या सामाजिक व पर्यावरणाविषयी असलेली बांधिलकी आणि धोरण याची माहिती वेळोवेळी सर्व अंतर्गत कर्मचारी तसेच बाहेरचे सर्व संबंधित यांना देत जाईल.